## विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्र, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली (STRC)

गोंडवाना विद्यापीठ MIDC रोड कॉम्प्लेक्स,गडचिरोली -४४२६०५

Affiliated to Gondwana University Gadchiroli (College code – 092)

### एका वर्षीय पूर्ण वेळ पदविका अभ्यासक्रम

**विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्र व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमानाने विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्र च्या कॅम्पसमध्ये पदविका अभ्यासक्रम करिता प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होत आहे.**

| अ.क्र | अभ्यासक्रम तपशील | कालावधी | विद्यार्थी क्षमता |
|---|---|---|---|
| १ | Undergraduate Diploma in Bamboo Entrepreneurship and Design | १ वर्ष | ३० |

पात्रता निकष :

१) उमेदवार १२ वी उत्तीर्ण असावे.

२) उमेदवाराचे वय १८ ते २५ वर्षाच्या दरम्यान असावे.

३) प्रवेशाकरिता प्रथम येणाऱ्यास प्राधान्य.

शैक्षणिक सत्र २०२१-२२

प्रवेश अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख : दि.३० सप्टेंबर २०२१

फोन : ०७१३२-२२३३१५ । मो: ०८७८८८७४२८२ / ०९७४८०११९८६

ईमेल:strc.academic@gmail.com

अधिक माहितीसाठी http://www.strc.org.in / www.unigug.ac.in ह्या संकेतस्थळावर भेट द्यावी.

**इच्छुक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अहर्ता प्रमाणपत्र/कागदपत्र सोबत दोन पासपोर्ट साईझ फोटोसह सकाळी १०.०० ते दुपारी २.०० च्या दरम्यान STRC कार्यालयास भेट द्यावी.**

मुख्य कार्यक्रम अधिकारी व प्रमुख
विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्र,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

SCIENCE & TECHNOLOGY RESOURCE CENTRE
S.T.R.C.
GONDWANA UNIVERSITY GADCHIROLI



# एक वर्षीय पदविका अभ्यासक्रम
# ‘बांबू उद्योजकता आणि रचना’

## माहिती पुस्तीका
## २०२१ - २२

## विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्र
व्दारे कार्यान्वीत

आय.डी.सी. स्कूल ऑफ डिझाईन,
भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई
व्दारे अभ्यासक्रम विकसित

गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली
संलग्नीत

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठाची स्थापना गडचिरोली आणि चंद्रपूर या आर्थिक, सामाजिक तसेच सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेल्या जिल्हयांच्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या दूरदृष्टीतून करण्यात आली आहे. सर्वसमावेशक विकासात्मक राज्याचे कल्याणकारी धोरण राबविण्यासाठी शासकीय यंत्रणांचे जाळे सातत्याने प्रयत्न करीत असले तरी, राज्याच्या इतर क्षेत्रांच्या तुलनेत या भागातील प्रगती कमी झाली आहे. या फरकामुळे अनेक सामाजिकत्व राजकीय तणाव आणि समस्या निर्माण झाल्या आहेत, समावेशक प्रगती या सर्वांना योग्य उत्तर असून नवीन विद्यापीठ स्थापन करणे हे त्या दिशेने एक योग्य पाऊल आहे.

विद्यापीठाच्या संकलित आकडेवारीवरून असे दिसून येते की या भागामध्ये प्रामुख्याने पूर्वीपासूनचे दारिद्र्य, स्थितप्रिय मानसिकता, पारंपारिक अज्ञानामुळे उद्‌भवणारे दिशाहीनपणा यासारख्या विशिष्ट समस्या आहेत. या सर्वाचा एकत्रित परिणाम म्हणून स्थानिक लोक आणि उर्वरित मुख्य प्रवाहातील समाज यांच्यात खोल दरी आहे. हे वास्तव बदलण्यासाठी विद्यापीठाने योग्य कार्यपद्धतींवर विचार केला आहे विद्यार्थ्यांमधील प्रेरक शक्ती वाढविण्यासाठी देखील त्याच वेळी प्रयत्न केले  जेणेकरून त्यांच्यात स्वविकासाची आशा आणि महत्वाकांक्षा राहील. हे निश्चितच एक प्रचंड कार्य आहे, परंतु त्याच वेळी हे एक योग्य आव्हान आहे आणि आम्ही हे स्वेच्छेने स्वीकारले आहे.

### व्हिजन

गोंडवाना विद्यापीठ हे भारतीय उच्च शिक्षण प्रणालीमध्ये आदर्श म्हणून स्थापित करणे आणि समाजातीज सर्व घटकांमधील विद्यार्थ्यांना दर्जेदार उच्च शिक्षण देऊन नैतिक आणि नैतिक मूल्ये जागृत करणे जेणेकरून ते प्रगल्भ आणि भारताचे जबाबदार नागरिक बनतील.

### मिशन

ग्रामिण आणि निमशहरी भागातून येणाऱ्या वेगवेगळ्या ईच्छा आकांक्षा आणि वयोगटातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, महत्वाची सर्व व्यावसायिक कौशल्ये आणि समकालीन जागतिक परिस्थितीत करियर घडवण्यासाठी आवश्यक कौशल्ये देऊन सक्षम करणे.

# विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्र

## गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्र (एस.टी.आर.सी.) ही राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग (आर.जी.एस.टी.सी.) मुंबई, महाराष्ट्र शासन द्वारा संकल्पित आणि अर्थ सहाय्यित एक स्वायत्त संस्था आहे. शाश्वत मुल्यनिर्मितीसाठीचे केंद्र म्हणून भूमिका पार पाडण्यासोबतच, एस.टी.आर.सी. वर गडचिरोली जिल्हयातील मागास आणि वंचित आदिवासी समाजासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रोजगार निर्मितीची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

### एस.टी.आर.सी. ची उद्दिष्टे

- उपयोजित विज्ञान व तंत्रज्ञानासाठी प्रादेशिक केंद्र आणि माहितीचा स्त्रोत म्हणून एस.टी.आर.सी. ला विकसित करणे.
- रोजगाराच्या स्वरूपात सुधारणा करणारे आणि उत्पन्न वाढवणारे प्रकल्प विकसित करणे आणि राबवणे.
- बाजारपेठ आणि व्यावसायिक व्यासपीठ उपलब्ध करून देऊन शाश्वत महसूल निर्मितीचे प्रारूप निर्माण करणे.
- स्थानिक स्वराज्य संस्था आणि राज्य सरकारची यंत्रणा तसेच वेगवेगळया समाजसेवी संस्था, स्वयंसहायता गट यांच्या सोबत काम करणे.

### बांबू हस्तकला आणि उपजिवीकेची उद्दिष्टे

- एस.टी.आर.सी. प्रशिक्षीत आणि पारंपारिक बांबू कारागिरांचा समूह विकसित करणे.
- बांबू हस्तकलेभोवती उद्योजकतेचे वातावरण निर्माण करणे आणि एस.टी.आर.सी. रूटेड फाउंडेशनच्या माध्यमातून नवउद्योजकांना सहाय्य करणे.
- बांबूच्या वस्तूंचे प्रशिक्षण, उत्पादन आणि संशोधन यासाठी सर्व सुविधांयुक्त मॉडेल प्रॉडक्शन युनिट स्थापन करणे.
- आदर्श बांबू ग्राम आणि सामायिक सुविधा केंद्र विकसित करणे.
- बांबूच्या वस्तूंच्या उत्पादनातून या भागातील अदिवासी आणि महिलांचा आर्थिक विकास करणे.

# बांबू उद्योजकता आणि रचना

गडचिरोली जिल्ह्यात नैसर्गिक रित्या मोठ्या प्रमाणात बांबू उपलब्ध आहे. पेसा कायदा आणि वन हक्क कायद्याअंतर्गत स्थानिक ग्राम सभांना बांबू वापरण्यास परवानगी आहे. या बांबूपासून शोभेच्या वस्तु, रोजच्या वपरातील वस्तु, फर्निचर तसेच बांधकाम साहित्याच्या निर्मितीसाठी मोठी संधी आहे. बांबूच्या अशा नाविन्यपूर्ण वापरामुळे ग्रामसभांना बांबूचा चांगला दर मिळू शकतो तसेच बांबू कारागिरांच्या रुपाने गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होवू शकते.

यासाठी बांबूबद्दल उपयोजित व ज्ञान, बांबू प्रक्रीया यंत्रे वापरण्याची कौशल्ये, बांबूच्या नवीन रचना घडवण्याची कौशल्ये आणि उद्योजकते बाबत प्राथमिक माहिती या गोष्टी अत्यावश्यक ठरतात. या सर्व गोष्टी शिकण्याची संधी गडचिरोलीतील व युवक युवतींना उपलब्ध करून देण्याच्या हेतूने 'बांबू उद्योजकता आणि संरचना' हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. या अभ्यासक्रामाची संरचना आय. आय. टी. मुंबई येथील तज्ञांनी केली असुन बांबू क्षेत्रात करियर घडवण्यासाठी आवश्यक सर्व कौशल्ये आणि ज्ञान या अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत.

**हा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यास खालील नमूद ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील:**

- बांबूच्या वस्तू बनवणारे कारखाने, बांबू क्षेत्रात काम करणाऱ्या सरकारी तसेच समाजसेवी संस्था या ठिकाणी पर्यवेक्षक किंवा व्यवस्थापक.
- बांबूच्या वस्तूंचे रचनाकार किंवा संशोधन सहाय्यक.
- शाळा, कॉलेज किंवा इतर प्रशिक्षण संस्थांमधे हस्तकला प्रशिक्षक.
- बांबूच्या वस्तूंचे मार्केटिंग आणि उद्योग.
- बांबू पुरवठा आणि प्रक्रिया साखळीत काम करणे.
- बांबू हस्तकलेतील मुक्त व्यावसायिक म्हणून खाजगी आणि सरकारी संस्थांसोबत काम.
- स्वत:चा बांबू हस्तकला व्यवसाय सुरु करणे.

**पदविकेचे स्वरूप व पात्रता**

१. पदविकेचे नाव : बांबू उद्योजकता आणि रचना

२. पदविकेचा कालावधी : १ वर्ष

३. प्रवेशासाठी पात्रता : १२ वी पास

४. पदविकेचा स्तर : पदवीपूर्व

५. प्रवेश क्षमता : ३० विद्यार्थी

६. प्रवेशाकरीता प्रथम येणाऱ्यास प्राध्यान

# First Semester

### Theoretical Study

- Introduction to bamboo craft
- Introduction to bamboo hand tools and processes
- Training of slats & slivers making, treatment, weaving, dyeing etc.
- Introduction to raw materials
- Product prototyping and production
- Understanding world view about bamboo
- Introduction to bamboo processing machines and demonstration
- Bamboo surface embellishments and decorative techniques
- Carpentry, metal and industrial plastic: material and workshop safety
- Introduction to bamboo structural, furniture and construction

### Employability Skills

- Understanding social capital
- English literacy
- Communication skills and personality development
- Digital literacy
- Entrepreneurship & bamboo business management
- HR & team management
- Bamboo procurement, production processes and logistics
- Accounting & finance
- Government policies and statutory rules

### Engineering Drawing

- Introduction to CAD Software
- Basic drawing in 2D
- Introduction to CAD basic drawing in 3D
- Reading blueprints
- Printing product drawings

# Second Semester

### Product Development:

- Craft based products
- Furniture and interior
- Structure
- Construction
- Jewellery
- Office accessories
- Home accessories
- Toys and musical instruments
- Lighting

### Business Skills:

- Internship
- Portfolio making
- Industry interface placement & exhibition
- Business plan development
- Cultural capital workshop
- Colloquium
- Marketing channels & e-commerce

## TEACHING AND EXAMINATION SCHEME WITH CREDIT SYSTEM

### I - SEMESTER

| Paper Name | Paper Code | Subject | Credit | % of Assessment (Subject Minimum Marks) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | IA | UE | Total | Min. Passing |
| Paper I | DBEDS 1P1 | PART A: Trade Theory 1 | 4 | 25 | 50 | 75 | 30 (40%) |
| | | PART B: Employability skills 1 (Transferable skills and Entrepreneurship) | 4 | 50 | 100 | 150 | 60 (40%) |
| Paper II | DBEDS 1P2 | PART A: Design | 4 | 25 | 50 | 75 | 30 (40%) |
| | | PART B: Engineering Drawing | 4 | 25 | 50 | 75 | 30 (40%) |
| | | PART C: Computer Aided Design | 4 | 25 | 50 | 75 | 30 (40%) |
| | | PART D: Social Development | 4 | | 25 | 25 | 10 (40%) |
| Practical | DBEDS 1P3 | Practical | 6 | 100 | 125 | 225 | 135 (60%) |
| | | **Total** | **30** | **250** | **450** | **700** | **325** |

### II - SEMESTER

| Paper Name | Paper Code | Subject | Credit | % of Assessment (Subject Minimum Marks) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | IA | UE | Total | Min. Passing |
| Paper I | DBEDS2 P1 | TRADE THEORY 2 Design Process Based: Product Development | 4 | | 75 | 75 | 30 (40%) |
| Paper II | DBEDS2 P2 | PART A: Business Plan Development | 4 | | 150 | 150 | 60 (40%) |
| | | PART B: Cultural Capital and Colloquium | 4 | | 50 | 50 | 20 (40%) |
| Paper III | DBEDS2 P3 | Marketing Channels and e-commerce | 4 | 25 | 50 | 75 | 30 (40%) |
| 5rtn Practica | DBEDS2 P4 | Trade Practical: Design Process Based Product Development | 6 | | 150 | 150 | 90 (60%) |
| | | Internship | 6 | | 175 | 175 | 105 (60%) |
| | | Portfolio Making | 6 | | 25 | 25 | 15 (60%) |
| | | **Total** | **30** | **25** | **675** | **700** | **350** |

### प्रवेश प्रक्रिया


इच्छुक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र/कागदपत्र सोबत दोन पासपोर्ट फोटोग्रापसह एस.आर.सी कार्यालयास प्रत्यक्ष भेट द्यावी

अधिक माहितीसाठी एस.टी.आर.सी कार्यालयाशी संपर्क साधावा

- फोन नं: ०७१३२–२२३३१५
- मो. नं: ०८७८८८७४२८२, ०९७४८०११९८६
- ईमेल: strc.academic@gmail.com

कार्यालयाचा पत्ता: गोंडवाना विद्यापीठ, एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५









**R & D on Low-Cost Technology**









## विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्र

गोंडवाना विद्यापीठ, एम.आय.डी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

**strc.academic@gmail.com, strc.gug@gmail.com**

**07132 - 223315**

**www.strc.org.in**

## गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

एम.आय.डी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

**www.unigug.ac.in**